**विशेष दिवाणी दावा नं.१९८/२०२३(नि.८४ लगत)**

**जादा सरतपास वादीतर्फे ॲड.आर. आर. यादव यांच्यातर्फे सुरु-**

२२. आम्ही विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडे विक्रीसाठी परवानगी मागितली होती. आम्हाला परवानगीचे पत्र मिळाले होते. मला आता नि.क्रं.३४ वरील कागद यादी सोबतचा मुळ विक्री परवानगी दाखविणेत आली. सदरचे पत्र तेच असुन त्यावर आयुक्त पुणे विभाग, पुणे करीता यांची सही आहे. सदर पत्रास **नि.क्रं.९२** देणेत येते.

**(प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्रं.१ ते ३ यांच्याविरुद्ध एकतर्फा चालु असल्याने उलटतपास नाही.)**

**उलटतपास प्रतिवादी क्रं.४ व ५ तर्फे ॲड. ए. पी. बोत्रे यांचेतर्फे**

२३. माझे डी.फार्मचे शिक्षण झालेले आहे. मी शेती व मेडिकलचा व्यवसाय करतो. माझी कोचळेवाडी येथे शेती आहे. हे म्हणणे खरे आहे की मी जन्मापासुन वाई येथेच राहतो. माझा निंबाळकरांशी वैयक्तीक कधीही संबंध आलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की त्यामुळे आज ते न्यायालयात उपस्थीत आहेत का हे मला सांगता येणार नाही. जयवंत पवार याच्यासोबत वादातीत व्यवहाराच्यावेळी पहिल्यांदाच ओळख झाली. जयवंत पवार याने कोणकोणते उदयोग व व्यवहार केले याची खातरजमा मी केली नाही. दावा मिळकतीचा ७/१२ बघुन मी व्यवहार केला होता. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकतीबाबत मी इतिहास बघितला नाही. माझ्या वकिलांनी बघितला होता. हे म्हणणे खरे आहे की मी वकिलांना जी कागदपत्रे दिली त्यावरुनच वकिलांनी मला व्यवहार करणेस हरकत नाही असे सांगितले. मी ७/१२ उताऱ्या व्यतिरीक्त इतर कोणताही कागद वकिलांकडे दिला नव्हता. दाव्यातील मजकुराची मला माहिती आहे. हे मला आठवत नाही की दावा मिळकतीची खरेदी-विक्री व्यवहार करण्यापुर्वी जाहीर नोटीस दिली होती किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की माझ्या सरतपासामध्ये जाहीर नोटीसचा कुठेही उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की तशी जाहीर नोटीस माझ्या रेकॉर्डला नाही. हे मला आठवत नाही

की मी वकिलांकडुन दावा मिळकतीचा शोध अहवाल घेतला होता किंवा कसे. माझा जयवंत याच्याबरोबर केवळ व्यवहारापुरता संबंध होता. त्यानंतर आजतागायत माझा त्याच्याशी संबंध नाही. जयवंत पवार याला मी व्यवहारादिवशीच भेटलो. हे म्हणणे खरे आहे की व्यवहाराच्या पुर्वी व त्यानंतर माझा त्याच्याबरोबर संबंध आला नाही. हे म्हणणे खरे आहे की जयवंत पवार याने वादातील व्यवहार करणेपुर्वी काय व्यवहार केले याची मला माहिती नाही. प्रस्तुत दावा दाखल करण्यापुर्वी दावा मिळकतीचा दुसरा दावा चालु आहे किंवा कसे याची माहिती मी घेतलेली नाही. जयवंत पवार याने दि.१८.०२.२००८ रोजी दावा मिळकत विक्रीचा व्यवहार प्रतिवादी क्रं.४ व ५ यांच्याबरोबर केला होता याची मला माहिती नाही. सदरचा व्यवहार ५,००,०००/- रुपयेला ठरला होता याची मला माहिती नाही. सदर व्यवहारापोटी ४,००,०००/- रुपये विसार म्हणुन प्रतिवादी क्र.४ याने जयवंत पवार यास दिले होते याची मला माहिती नाही. विक्रीची परवानगी मिळाल्यानंतर उरलेले १,००,०००/- रुपये खरेदीखताचेवेळी दयायचे ठरले होते याची मला माहिती नाही. हे मला माहित नाही की जयवंत पवार याने फसवल्याने प्रतिवादी क्रं.४ व ५ यांनी प्रतिवादी क्रं.१ ते ३ यांच्याविरुद्ध सातारा येथील न्यायालयात स्पे.दि.मु.नं.३७/२०११ हा दाखल केला होता. हे मला माहिती नाही की सदर दावा वाई न्यायालयात वर्ग झाला व त्यास रे.दि.मु.नं.१८२/२०१२ पडला. हे मला माहित नाही की सदरचा दावा गुणदोषावर चालुन न्यायालयाने मंजुर केला व प्रतिवादी क्रं. १ ते ३ यांनी प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्रं.४ व ५ यांच्या लाभात खरेदीपत्र करुन दयावे असा आदेश पारीत केला. प्रतिवादी क्रं.४ व ५ या दाव्यात का हजर झाले याची माहिती मी घेतलेली नाही. त्यांचा आधीचा जो काही व्यवहार होता त्यासाठी ते या दाव्यात हजर झाले. त्यांनी आमच्यासारखाच दावा पुर्वी दाखल केला होता व त्याचा त्यांच्या बाजुने निकाल झाला याची माहिती वकिलांकडुन घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी क्रं.१ व २ यांनी दि.०३.०४.२०११ रोजी दैनिक पुढारी आणि दि.०५.०४.२०११ रोजी दैनिक सकाळमध्ये संदिप पवार या वकिलांमार्फत जाहीर नोटीस देवुन जयवंत पवार यांना दिलेले मुखत्यारपत्र रद्द केले. हे म्हणणे खरे आहे की प्रस्तुतचा दावा सदर मुखत्यारपत्र रद्द केल्यानंतर दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे

की साठेखतातील शर्तीमध्ये जर खरेदीचा व्यवहार होऊ शकला नाही तर जयवंत पवार याने घेतलेली रक्कम त्याने घेतलेल्या दिवसापासुन १८ टक्के व्याजदराने परत दयायची असे नमुद आहे. दावा मिळकतीत सद्यस्थितीत कोणाचा कब्जा आहे हे मला माहित नाही. तसेच दावा मिळकतीत काय पिके आहेत हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकतीत जाण्याचा माझा कधीही संबंध आलेला नाही. हे मला माहित नाही की खरेदीपत्र प्रतिवादी क्रं.४ व ५ यांच्या लाभात करुन देण्याचा व इतर कोणाही तिऱ्हाईत व्यक्तीबरोबर व्यवहार करु नये असा देखील आदेश न्यायालयाने दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की न्यायालयाने पुर्वीच आदेश केलेला असल्याने मला दावा मिळकतीचे खरेदीपत्र करुन मिळावे ही मागणी करण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्रं.४ व ५ यांना त्यांचा अधिकार डावलण्याकरीता आम्ही हेतुपुरस्सर दाव्यात सामील केले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्रं.४ व ५ यांचा अधिकार डावलण्याच्या हेतुने मी व प्रतिवादी क्रं.१ ते ३ यांनी संगनमताने हा दावा दाखल केलेला आहे. हे मला माहित नाही की पुर्वीच्या दाव्यात आमचे यादव वकील हेच जयवंत पवार याच्याबाजुने काम बघत होते. हे म्हणणे खरे नाही की आमचे वकील व जयवंत पवार यांचे वकील एकच आहेत हा आमच्या संगनमताचा एक भाग आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटा दावा दाखल करुन खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या प्रतिज्ञापत्रातील मजकुर मला माहिती नसुन तो खोटा आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्थळ : वाई.
दिनांक : २७.०२.२०२६

(ए. ए. पाचरणे)
सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
वाई.